दै लोकमत (२०)

राज्यात पहिल्यांदाच नांदेड महापालिका निवडणुकीत होणार प्रयोग, सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात

# व्ही.व्ही.पॅटद्वारे मिळणार मतदा

अनुराग पोवळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड: विविध निवडणुकांसाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम अर्थात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राबाबत घेतली जाणारी शंका दूर करण्यासाठी निवडणूक आयोगाने आता पावले उचलली असून नांदेड महापालिकेच्या निवडणुकीत मतदारांना आपण कोणाला मतदान केले याची माहिती वोटर व्हेरीफाईड पेपर ऑडिट ट्रेलद्वारे मिळणार आहे. राज्यात पहिल्यांदाच हा प्रयोग केला जाईल.

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका ऑक्टोबर २०१७ मध्ये होणार आहेत. या निवडणुकीची प्रशासकीय पातळीवर तयारी वेगात सुरु आहे. आतापर्यंत मतदान यंत्राबाबत माहिती देणारे दोन प्रशिक्षणही घेण्यात आले आहेत. प्राथमिक मतदार यादीही प्रसिद्ध करण्यात आली आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याची अपेक्षा राजकीय क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत. दुसरीकडे राजकीय पक्षांची तयारीही अंतिम टप्प्यात आली आहे.

ईव्हीएम अर्थात ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राबाबत सातत्याने संशय घेतला जात आहे. देशपातळीपासून ते स्थानिक पातळीपर्यंत हा संशय कायमच राहिला आहे. हाच संशय दूर करण्यासाठी निवडणूक आयोगाने प्रयत्न सुरु केले आहेत. वोटर व्हेरीफाईड पेपर ऑडिट ट्रेलच्या माध्यमातून मतदारांना आपण केलेले मतदान त्याच उमेदवाराला गेल्याचे दिसणार आहे. मतदान यंत्रावरील उमेदवारांच्या निशाणीसमोरील बटन दाबताच व्हीव्ही पॅटवर उमेदवाराचे नाव, निशाणी येणार आहे.

सदर मतदानाची पावती व्हीव्ही पॅटमध्ये जमा होणार आहे. मतदान केंद्राच्या बॅलेट मशिनवरील एकूण मतदान आणि व्हीव्ही पॅटमध्ये जमा झालेल्या मतदानाच्या पावत्यांचा आकडा एकच येणार आहे. त्यातून केंद्रावर झालेले एकूण मतदान स्पष्ट होईल.

## निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी आज नांदेडात

◆ नांदेड महापालिकेच्या सप्टेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने सुरु असलेल्या प्रशासकीय तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी मंगळवारी नांदेडमध्ये दाखल होणार आहेत. त्याचवेळी राज्यात पहिल्यांदाच अवलंबिण्यात येणाऱ्या व्हीव्ही पॅट पेपर ऑडिट ट्रेलच्या प्रशिक्षणाबाबतही ते माहिती घेणार आहेत. निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींकडून नोंदविले जाणारे निरीक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



प्रशिक्षण : नांदेड महापा
केला जाणार असून या मशिन
देण्यात आले. यावेळी निवड
इंगोले, सादिक, सुहास टाक
व्ही. व्ही. पॅट मशिन वाप

दै पुण्यनगरी (२१)

मतदानाची पावती

# राज्यातील पहिला मान नांदेडला



▸ राज्य निवडणूक आयोगाकडून सुविधा देण्याची तयारी सुरू

▸ मत दिलेल्या उमेदवाराचा तपशील मतदारांना दिसणार

नांदेड, दि.२८: आपण कोणत्या उमेदवारास मतदान केले, त्याची पावती दिसण्याचा राज्यातील पहिला प्रयोग नांदेड शहरात राबवला जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने नांदेड महापालिका निवडणुकीसाठी या प्रकल्पाची तयारी सुरू केली असून, सोमवारी (दि.२८) हैद्राबादच्या तज्ज्ञ अभियंत्यांनी या प्रकल्पाचे सादरीकरण केले. मंगळवारी (दि.२९) राज्य निवडणूक आयोगाचे पथकही या कामासाठी दाखल होणार आहे. मतदान केल्यानंतरची पावती कशी दिसते, याची मतदारांमध्ये उत्सुकता लागून आहे. प्रायोगिक तत्त्वावर शहरातील सुमारे ५० टक्के मतदान केंद्रावर हा प्रयोग राबवण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठरविले असून, राज्य निवडणूक आयोगाशी चर्चा केल्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. देशपातळीवरील या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारी नांदेड ही पहिलीच महापालिका असेल, असे सांगितले जात आहे.

मतदान प्रक्रियेसाठी इलेक्ट्रॉनिक यंत्रे वापरात आल्यापासून सर्वत्र संभ्रमाचे वातावरण तयार झाले. मतदान व मतमोजणीची प्रक्रिया अगदी झटपट होऊन काही तासांत निकाल बाहेर पडू लागल्याने, सरकारी यंत्रणेपासून उमेदवार व मतदारांपर्यंत सर्वांकडूनच या साधनाचे स्वागत केले गेले. परंतु, पराभूत उमेदवारांनी मतदानयंत्रावर पराभवाचे खापर फोडण्यास सुरुवात केल्यानंतर मतदान यंत्रातही घोळ करता येतात, यावर काही जणांचा विश्वास बसू लागला. ईव्हीएमवर मतदान केल्यानंतर मत विशिष्ट उमेदवारास जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने ज्या उमेदवारास मतदान केले, त्याचे नाव दर्शवणारी पावती दाखविण्याची व्यवस्था नि
आयोगाने चार वर्षांपूर्वी सुरू व

## अशी असेल पावती

मतदानाचा पुरावा दाखविण्यासाठी मतदानयंत्रातच पावती दाखविण्याचे तंत्र विकसित करण्यात आले आहे. ही पावती मतदानयंत्राच्या बाजूला पारदर्शक आच्छादनात एक पेटी सर्व बाजूने बंद असेल. मतदारांनी मतदान केल्यानंतर पेटीच्या काचसदृश्य आच्छादनातील विजेचा प्रकाश सुरू होऊन एक पावती दिसेल. ही पावती केवळ दोनच सेकंद तेथे पाहता येईल. सदर पावतीवर मतदाराने कोणत्या उमेदवारास मतदान केले, याची माहिती मतदारास पडताळून पाहता येईल. त्यानंतर ती लगेच मतदानयंत्राच्या खालच्या बाजूला असलेल्या बंद पेटीत पडेल. प्रत्येक मताची वेगवेगळी पावती असेल. पावती पडलेली पेटी कायम ▪ पान २ वर

## वादाची सुरूवात नांदेडा

नांदेड जिल्ह्यातील
विधानसभा मतदारसंघात तत
मुख्यमंत्री व कॉंग्रेसचे उ
अशोक चव्हाण यांच्या
सर्वप्रथम न्यायालयीन
झाल्यानंतर देशभरात ईव्हीएमच्या विश्वासार्हतेचा
चर्चेला आला. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गे
पाठोपाठ अलीकडेच झालेल्या काही राज्यांच्या विध
निवडणुका, तसेच महाराष्ट्रातील महापालिका व
परिषद निवडणुकींत सत्ताधारी पक्षांकडून मतदा
हेराफेरी करून झालेली मते आपल्या बाजूने वळवि
ओरड मोठ्या प्रमाणावर झाली. पुण्यासारख्या
ज्ञाननगरीतील मतदारांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच
अंत्ययात्रा काढल्यानंतर देशभरात त्याची चर्चा झाल
पार्श्वभूमीवर न्यायालयात अनेक प्रकरणे दाखल झाल
सर्वोच्च न्यायालयाने त्याची गंभीर दखल घेतली.
कोणाला केले, हे पाहण्याचा मतदारांचा हक्क असल्याचे
करून निवडणूक आयोगाला तशी व्यवस्थाच मतदा
करण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने त्यामुळे ईव्ही
मतदान केल्यानंतर मतदारांना त्यांनी कोणत्या उमेद
मतदान केले, याचा पुरावा दाखविण्याची व्यवस्था करण्य
मतदानयंत्रात आवश्यक त्या सुधारणा केल्या गेल्या. क
उमेदवाराला मतदान केले, याची पावती दाखवून ती स
ठेवण्याची यंत्रणा विकसित केली गेली. ▪ पान २ व